

CIDCO
WE MAKE CITIES

THE TIMES OF INDIA, MUMBAI
TUESDAY, APRIL 22, 2025

# NM Metro: Paving the way for seamless urban connectivity

The Navi Mumbai Metro has emerged as a transformative mode of public transport, designed to meet the city's growing mobility demands and support the expanding urban landscape. Spearheaded by CIDCO, the metro network aims to ensure seamless connectivity between key nodes within Navi Mumbai and with Greater Mumbai.

"The Navi Mumbai Metro project has been planned to provide excellent intra-city connectivity within Navi Mumbai. Metro line no. 1, developed from Belapur to Pendhar, has received a great response from commuters since day one. This metro line has provided excellent connectivity to CIDCO housing complexes in CBD Belapur, Taloja MIDC, Kharghar, and Taloja. The implementation of metro line no. 2, 3, and 4 will also be carried out shortly. Additionally, there is an ambitious plan to connect Navi Mumbai International Airport and Chhatrapati Shivaji Maharaj International Airport in the coming period," said Vijay Singhal, vice chairman and managing director, CIDCO.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

सकाळ मुंबई, मंगळवार, २२ एप्रिल २०२५

# 'अग्निशमन'तर्फे वाहन जनजागृती

## पनवेल महापालिका, सिडकोकडून रॅलीचे आयोजन

पनवेल ता. २१ (बातमीदार) : अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त नागरिकांमध्ये अग्नी सुरक्षेबाबत जनजागृती केली जात आहे. पनवेल महापालिका अग्निशमन दल आणि सिडको अग्निशमन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (ता. १९) नवीन पनवेल ते खारघर अशा भव्य अग्निशमन वाहन रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या रॅलीची सकाळी १० वाजता नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरुवात करण्यात आली. या वेळी मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, हरिदास सूर्यवंशी, संदीप पाटील तसेच महिला व पुरुष अग्निशमन कर्मचाऱ्यांनी या रॅलीचे प्रतिनिधित्व केले. नवीन पनवेल अग्निशमन केंद्र येथून सुरुवात झालेली ही रॅली खांदा कॉलनीमधील ब्रिजमार्गे कामोठे, कामोठे ते महामार्गावरून मंकी पॉइंट खारघर, मंकी पॉइंट ते शिल्प चौक, शिल्प चौक ते रामशेठ ठाकूर शाळा, ग्रामविकास भवन या मार्गाने येत खारघर अग्निशमन केंद्र येथे रॅलीची सांगता झाली.

या रॅलीमध्ये महापालिकेच्या अग्निशमन विभागातील विविध वाहने सहभागी झाली होती. या वेळी नागरिकांनी या उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले. या रॅलीच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी 'एकत्र येऊ, अग्निसुरक्षित भारत घडवू' असा संदेश देण्यात आला.



पनवेल : अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त जनजागृती फेरी काढण्यात आली

### शूर अग्निशमन कर्मचाऱ्यांचे स्मरण

अग्निशमन सेवा सप्ताह दरवर्षी १४ ते २० एप्रिलदरम्यान साजरा केला जातो. १३ एप्रिल १९४४ रोजी मुंबईतील व्हिक्टोरिया डॉक येथे झालेल्या दुर्घटनेत ७१ शूर अग्निशमन कर्मचाऱ्यांनी प्राणांची आहुती दिली होती. त्यांच्या स्मरणार्थ आणि अग्नी सुरक्षेबाबत जागरूकता वाढवण्यासाठी हा सप्ताह साजरा केला जातो.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd




मंगळवार,
२२ एप्रिल २०२५ लोकसत्ता

# नवी मुंबई विमानतळावरील उड्डाणांसाठी बैठकांचे सत्र

लोकसत्ता प्रतिनिधी

**नवी मुंबई :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातून जून महिन्यात पहिले उड्डाण व्हावे यासाठी सिडको मंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी प्रत्येक १५ दिवसांत एकदा आढावा बैठकांचे सत्र आखले आहे.

अदानी समूह आणि सिडको मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून कामाच्या प्रगतीची माहिती या बैठकीतून घेतली जात आहे. मुंबई येथील निर्मल भवन येथे गुरुवार १७ एप्रिल रोजी यासंदर्भातील बैठक पार पडली. यावेळी सिंघल यांच्यासह सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शांतनु गोयल, मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) गीता पिल्लई, अदानी समूहाचे संचालक जीत अदानी व मलय महादेवया, एनएमआयएएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी बीव्हीजीके शर्मा आणि एल अँड टीचे उपाध्यक्ष एन. नामचिवायम हे उपस्थित होते. या बैठकीत विमानतळ परिसरातील धावपट्टी, टॅक्सीवे आणि वैमानिक बफर क्षेत्राचे (एअरसाइड) काम पूर्ण झाल्याची माहिती अदानी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

नवी मुंबई विमानतळाच्या प्रकल्पठिकाणी तसेच टर्मिनल इमारतीची कामे वेळेत पूर्ण करण्यावर या बैठकीत भर देण्यात आला. डीजीसीए व बीसीएएसकडून अनुज्ञप्ती व सुरक्षाविषयक परवानगी प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे अदानी कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगीतले. जून महिन्यात दिलेल्या मुदतीत प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण करण्याचे आश्वासन अदानी कंपनीने दिले. सध्या प्रकल्पात सुरक्षेविषयक (ओआरएटी) चाचण्या सुरू आहेत.

## काम अंतिम टप्प्यात

सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक सिंघल यांनी या बैठकीत विमानतळ प्रकल्पाला महामार्गाशी जोडणाऱ्या दळणवळणाच्या रस्ते बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. तसेच उद्घाटनापूर्वी संबंधित दळणवळण प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याचे निर्देश सिंघल यांनी सिडकोच्या अधिकाऱ्यांना दिले. विमानतळ प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात कोड-एफ धावपट्टी, दोन समांतर टॅक्सी मार्ग, टी-१ टर्मिनल, कार्गो टर्मिनल व इतर पायाभूत सुविधांचे काम अंतिम टप्प्यात आहे.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd

CIDCO
WE MAKE CITIES

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । मंगळवार, २२ एप्रिल २०२५

# नवी मुंबई विमानतळ प्रकल्पाचा आढावा

**म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या उभारणीस गती देत सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी नुकतीच प्रकल्पाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीत सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनु गोयल, मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) गीता पिल्लई तसेच अदानी समूह व एल अँड टीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत सिंघल यांनी जीत अदानी (संचालक- एअरपोर्ट, अदानी समूह), मलय महादेवया, बीव्हीजीके शर्मा (मुख्य कार्यकारी अधिकारी, एनएमआयएएल), एन. नामचिवायम (उपाध्यक्ष, एल अँड टी) यांच्याशी चर्चा करीत विमानतळ प्रकल्पाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

विमानतळासाठी विमानतळ माहिती प्रकाशन (एआयपी) प्रकाशित झाल्यानंतर सध्या संचालक, नागरी विमान उड्डाण (डीजीसीए) यांच्याकडून विमानतळ अनुज्ञप्तीसाठी निरीक्षण सुरू आहे. त्यामुळे कामे वेगाने पूर्ण करण्यावर भर दिला आहे. एनएमआयएएलकडून एअरसाइडचे काम १०० टक्के पूर्ण झाल्याची माहि दिली असून, डीजीसीए व बीसीएएस यांच्याकडून आवश्यक परवाने मिळवण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. तसेच, ओआरएटी चाचण्या सुरू असून, अनेक विमान कंपन्यांनी नवीन वेळापत्रकासाठी अर्ज केले आहेत. डीजीसीए यावर लवकरच निर्णय घेणार आहे.

विमानतळाशी जोडलेल्या रस्ते कनेक्टिव्हिटी प्रकल्पाचाही आढावा त्यांनी घेतला. भारतीय महामार्ग प्राधिकरण आणि सिडकोकडून हे काम विमानतळाच्या उद्घाटनापूर्वी पूर्ण होईल याची खात्री करण्याचे निर्देश सिंघल यांनी दिले. प्रकल्पाच्या प्रगतीवर बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी सिंघल यांच्या नेतृत्वाखाली दर पंधरवड्याला आढावा बैठकांचे आयोजन करण्यात येणार आहे. या विमानतळाची एकूण क्षमता प्रतिवर्ष ९० दशलक्ष प्रवासी आणि ३. २ दशलक्ष टन मालवाहतुकीची असेल.

@CIDCO_LTD @CIDCO_LTD @cidco_ltd @cidco_ltd